# बातमी लेखन

- आजचे युग हे माहितीचे युग आहे.
- तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे यांच्यामुळे जग खरेच जवळ आले आहे.
- जगात कुठेही घडलेल्या घटना, त्याची अचूक माहिती आपल्याला घरात बसून वर्तमानपत्र, आकाशवाणी, दुरदर्शन या प्रसारमाध्यमांद्वारे सविस्तर कळते.
- रोजच्या जीवनातील अगदी **'जलवाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे उद्या शहराचा पाणीपुरवठा बंद राहील'** यांसारख्या आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित बातम्यांपासून **'भारताकडून क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी'** अशा राष्ट्रीय स्तरावरील महत्वाच्या बातम्यांपर्यंत सर्व बातम्या आपल्याला कळतात.
- **माहिती देणे, ज्ञान देणे, समाजप्रबोधन करणे, परिस्थितीची जाणीव करून देणे, हे बातमीचे प्रमुख उद्देश असतात.**
- थोडक्यात 'बातमी' हा आजच्या जीवनातला अविभाज्य घटक आहे आणि म्हणूनच वस्तुस्थितीचे चित्रण करणारी बातमी तयार करणे (बातमी लेखन करणे हे आज महत्त्वाचे कौशल्य ठरते.
- बातमी घडून गेलेल्या घटनांची त्याचबरोबर घडणाऱ्या नियोजित कार्यचीही होते.
- ज्यात काय घडले ? कोठे घडले ? कसे घडले ? कोण-कोण उपस्थित होते ? या प्रश्नांची उत्तरे मिळतात, ती म्हणजे बातमी.
- बातमी बात-मी 'अशी गोष्ट ज्यात 'मी' नाही म्हणजेच बातमी लेखनात जसे घडले तसे यथातथ्य वर्णन करायला हवे.

**बातमी लेखनासाठी आवश्यक गुण**

१. लेखन कौशल्य
२. भाषेचे उत्तम ज्ञान
३. व्याकरणाची जाण
४. सोपी, सुटसुटीत वाक्यरचना
५. समग्र वाचन

**कोणत्याही घडलेल्या घटनेची बातमी तयार करताना खालील गोष्टींचे भान राखणे महत्त्वाचे असते.**

१) घटनेची विश्वासार्हता.

२) तटस्थ भूमिकेतून लेखन.

३) घटनेचा अचूक व योग्य तपशील.

४) प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे लेखन होणे महत्त्वाचे.

५) स्वतःच्या मनाची कोणतीही बाब त्यात समाविष्ट करू नये.

## बातमी तयार करण्याचे निकष

- शीर्षक – बातमीचा मथळा हा संपूर्ण बातमीचा / घटनेचा आरसा असतो.
- दिनांक, स्थळ, कालावधी संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.
- घटना घडून गेल्यानंतर बातमी लेखन होत असल्यामुळे बातमी नेहमी भूतकाळातच लिहिली जावी.
- जनक्षोभ वाढेल, कुणाच्याही भावना दुखावल्या जातील अशी वाक्ये/शब्द बातमीत नसावेत असे संकेत आहेत.
- बातमी लिहिताना प्रथम महत्वाची मुद्दा नमूद करून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

**बातमी तयार करणे – मूल्यमापन कृती :**

१) दिलेल्या घटनेवर बातमी तयार करणे.

२) दिलेल्या सूचक शब्दांवरून बातमी तयार करणे.

३) कार्यक्रमाची बातमी तयार करणे.

नमुना कृती

**'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या उपक्रमास शहरातील सर्वच शाळांकडून उत्तम प्रतिसाद.**

आमच्या वार्ताहराकडून **लोकजागृती** दिनांक : १६ जानेवारी


## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमास उदंड प्रतिसाद

१ जानेवारी ते १५ जानेवारी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या निमित्ताने शाळाशाळांमधून मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम आयोजित केलेन जावेत, या उपक्रमास शहरातील सर्वच शाळांमधून उत्तम प्रतिसाद मिळाला.

आमच्या प्रतिनिधींनी काही शाळांमध्ये स्वतः जाऊन या उपक्रमाची माहिती घेतली. विद्यार्थ्यासाठी बहुतांश शाळांमधून वचन तासाचे आयोजन केले होते. या बरोबरच भाषेचे महत्त्व विशद करणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्या निमित्ताने सर्वच शाळांमध्ये ग्रंथ दिंडी, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, कथाकथन स्पर्धा, व्याख्याने अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील १०० शाळांमधून हा उपक्रम यशस्वीपणे राबवला गेला. दरवर्षी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' हा विद्यार्थी हिताचा उपक्रम शाळांमधून राबवला जाईल, अशी ग्वाही शाळांच्या मुख्याध्यापकांनी दिली.

**बातमीलेखन क्षेत्रे:**




**१. खालील शीर्षकावरुन बातमी तयार करा.**

> **शाळेचा शताब्दी वर्ष सांगता समारंभ माननीय शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न.**

**२. खालील विषयावर बातमी तयार करा.**

सर्व नागरिकांसाठी आधारकार्ड नंबर आपल्या बँकखात्यास लिंक करणे आनिवार्य.

**३. दिलेल्या सूचक शब्दांवरुन बातमी तयार करा.**

> **आंतरराज्यीय क्रीडा महोत्सव, अठरा क्रीडाप्रकार, युवा खेळाडू, प्रशिक्षक, भरघोस प्रतिसाद**

**४. खालील घटनेवर बातमी तयार करा.**

> **निरुपणकार सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते टार्गेट प्रकाशकाच्या 'करिअर मार्गदर्शक' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा**

५. खालील घटनेवर बातमी तयार करा.

टार्गेट प्रकाशकाच्या संगणक पुस्तक मालिकेचा प्रकाशन सोहळा माननीय महापौर यांच्या उपस्थितीत संपन्न

६. खालील विषयावर बातमी तयार करा.

काळाघोडा फेस्टिव्हलचा दिमाखदार समापन सोहळा

७. खालील विषयावर बातमी तयार करा.

अठरा वर्षे पूर्ण असणाऱ्या नागरिकांना मतदार ओळखपत्र मिळवणे अनिवार्य.

८. १५ डिसेंबर रोजी जिल्हापरिषद माध्यमिक शिक्षण विभाग, अमरावतीतर्फे आयोजित आंतरशालेय निबंधस्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न.

९. खालील विषयावर बातमी तयार करा.

तुमच्या शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा उद्घाटन समारंभ माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संपन्न

१०. आदर्श विद्यालय परभणी येथील शाळेतील 'रुबेला लसीकरणाची बातमी' खालील शब्दांवरून तयार करा.

- रुबेला लसीकरण
- भिंतीपत्रक/रांगोळी/चित्रकला
- शालेय स्तरावर स्पर्धा
- २० ते २५ नोव्हेंबर
- स्थानिक शासकीय आरोग्य विभाग व आदर्श विद्यालय